# University of Mumbai

परीक्षा विभाग/
वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/ वाणिज्य निकाल कक्ष/१६०९ /२०१६

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, ऑक्टो./नोव्हें., २०१६ (द्वितीय सत्र २०१६) मध्ये घेण्यात येणाऱ्या खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वरून Online घेण्यात येणार आहे.

1) M.Com (Sem-I to IV)(CBSGS) (Other than choice based system of Sem-I)

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज **mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page** या वेब लिंक वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने **Online** अर्ज भरण्याची, **Inward** करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | **Form Submission Report** व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २०/०९/२०१६ ते ३०/०९/२०१६ | ०५/१०/२०१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/— सहित | ०१/१०/२०१६ ते ०५/१०/२०१६ | ०७/१०/२०१६ पर्यंत |
| ३. | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | ०६/१०/२०१६ ते १०/१०/२०१६ | १५/१०/२०१६ पर्यंत |

ता. क. M.Com. (Sem. IV)परीक्षेचे अर्ज सादर करताना विद्यापीठ अद्यादेश क्र. ०.५९८२ यांचे तंतोतंत पालन करावे. विद्यापीठ अधिनियम क्रमांक ०.५९८२ खालीलप्रमाणे:—

"0.5982 : However no learner, will be allowed to appear for Sem.IV examination unless he/she has passed all the course of Sem. I & II examination previously"

उपरोक्त अधिनियमांचे उल्लघंन करून एखाद्या विद्यार्थ्याचा परीक्षेचा अर्ज विद्यापीठास सादर केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

उपरोक्त अधिनियमांचे उल्लघंन करून अपात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयाने विद्यापीठास सादर केल्यामुळे वेळे अभावी तसेच नजर चुकीमुळे जर एखादे प्रवेश पत्रक महाविद्यालयाला प्राप्त झाले व विद्यार्थ्यांने परीक्षा दिली तर त्या विद्यार्थ्यांचा परीक्षेचा निकाल रद्द करण्यात येईल. तसेच महाविद्यलयात जमा केलेल्या अपात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्जाचे प्रवेश शुल्काचा परतावा मिळणार नाही व त्यांचे परीक्षा अर्ज रद्द करण्यात येईल. संबंधित विद्यार्थी तसेच महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे— संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षाअर्ज mu.ac.in या संकेतस्थळावर Online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी Online भरलेले परीक्षाअर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षाअर्जांचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा अर्जांच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ०६ वाजता (१०/१०/२०१६ रोजी सायं.६ वा.) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

जे विद्यार्थी प्रथम सत्र २०१६ च्या एम. कॉम सत्र १ व २ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी विद्यापीठाकडे अर्ज सादर केला असेल, अशा विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या M.Com (Sem-IV) या परीक्षांसाठी परीक्षा प्रवेश अर्ज ( Provisional Basis) व त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच परिपत्रक जाहिर केल्यापासून विहित शुल्कासहित सादर करावेत तसचे फेरतपासणी/पुर्नमुल्यांकन च्या प्रक्रियेत संबंधित विद्यार्थी M.Com (Sem-I किंवा II) मध्ये पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचा एम. कॉम सत्र ४ या परीक्षेचा प्रवेश रद्दबाद करण्यात येईल अशा प्रकारचे हमी पत्र महावद्यिालयाने संबंधित विद्यार्थीकडून घेतल्या नंतरच सदर विद्यार्थ्याचा M.Com (Sem-IV) चा परीक्षा अर्ज विद्यापीठास सादर करावा अश विद्यार्थ्याची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाकडे राहील तसेच अशा विद्यार्थ्याची वेगळी यादी महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावी जेणे करून परीक्षा प्रवेश पत्र (Hall -Tickets) देण्याचे सोईचे होईल.

**ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र online पध्दतीने Inword झाले नाही तर त्या विद्यार्थ्यांने आपले परीक्षा आवेदनपत्र पारंपारीक पद्धतीने (Hard Copy स्वरूपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरून विद्यापीठाकडे पाठवावेत.**

तसेच M.Com (Sem IV)(CBSGS) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्याच्या परीक्षा शुल्कामध्ये रू.२५०/— पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

**टिप्पणी:—**

१. M.Com (Sem-I Fresh) Choice Base System/CBSGS अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा प्रवेश अर्ज भरण्याच्या तारखा नंतर जाहिर करण्यात येतील.

२. जे विद्यार्थी श्रेणी सुधारणीसाठी (Grade Improvement) अर्ज करणार आहेत त्यांनी प्रचलित पद्धतीनुसार परीक्षा प्रवेश अर्ज भरून त्यासोबत सर्व सेमिस्टरच्या (Sem- I, II, III & IV) उत्तीर्ण गुणपत्रिकांच्या छायांकित प्रती जोडून वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**(Web Link :- mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page)**

स्थळ : मुंबई. (दीपक वसावे)
दि. १९ सप्टेंबर, २०१६. स्था. परीक्षा नियंत्रक

---

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियत्रंक यांचे स्वीय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक